शैक्षणिक वर्ष २००६-०७ करीता औषधनिर्माणशास्त्राचा पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नविन संस्थांना मान्यता देण्याबाबत ...

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००५/(७०३/०५)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २४ मे २००६

**संदर्भ :-** १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि - १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२.शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-१, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
३. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र मान्यता २००५/(६३९/०५)/तांशि-६, दि. १५ मार्च, २००५.
४.शासनाचे पत्र क्र. मान्यता-२००५/ (७०३/०५)/ तांशि-६, दि.१ एप्रिल २००६

**शासन निर्णय :-** सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील औषधनिर्माणशास्त्राचा पदवीका अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार यासाठी उपरोक्त संदर्भ-३ नुसार राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी शासनाच्या संदर्भ- ४ मधील पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यस्तरीय समितीच्या शिफारसी विचारात घेऊन मान्यता दिलेल्या संस्थांना या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ ते ५ मध्ये नमूद केल्या प्रमाणे औषधनिर्माणशास्त्राचा पदवीका अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठी निम्न अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

- उपरोक्त संदर्भ -१ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक असतील.
- उपरोक्त संदर्भ -२ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान ५ वर्ष कालावधीसाठी आवश्यक मुदतठेवीची रक्कम संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी लागेल.
- शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणा-या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधिन पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
- सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील.